**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स लोणा इंडस्ट्रिज लिमिटेड, लाडिवली, पोस्ट - गुळसुंदे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड यांच्या कार्यरत सेंद्रीय रंगद्रव्य प्रकल्पात प्रस्तावित विस्तारासंबंधी प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचे इतिवृत्त**

| | |
|---|---|
| **जाहिर जनसुनावणी दिनांक** | -२०/०२/२०२० |
| **वेळ** | -दुपारी १२.०० वाजता |
| **स्थळ** | -'रसरंग' बिल्डिंग,एचओसी कॉलनी, पिलाई एचओसी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग व टेक्नोलॉजीच्या मागे, पोस्ट-रसायनी, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड |

**<u>प्रस्तावना:-</u>**

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स लोणा इंडस्ट्रिज लिमिटेड, लाडिवली, पोस्ट - गुळसुंदे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड यांचा कार्यरत सेंद्रीय रंगद्रव्य प्रकल्पात प्रस्तावित विस्तारासंबंधी प्रकल्पासाठी पर्यावरण अनुमती मिळविण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

प्रकल्प प्रवर्तकांना दिनांक ०८-०३-२०१८ रोजी काही अटी व शर्ती निर्देश करून पर्यावरण आघात रुपरेषा करण्यास

(टीओआर- टर्म्स ऑफ रेफरन्स) प्राथमिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ११/२०२०, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-३२६ दिनांक ३०-०१-२०२० (परिशिष्ठ “अ”) अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, रायगड - अध्यक्ष
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, - सदस्य
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१ - समन्वयक
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई

भारत सरकारच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचनेनुसार जनसुनावणी बैठकीच्या तीस दिवस अगोदर जास्त प्रमाणात प्रसारित होणा-या स्थानिक दैनिक वृत्तपत्र

'सकाळ' व दैनिक 'कृषिवल' यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र 'इंडियन एक्सप्रेस' या इंग्रजीत दिनांक १८-०१-२०२० रोजी पर्यावरणविषयक जनसुनावणीची जाहिर सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती (परिशिष्ठ “ब”). त्यात सदरहू प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय हरकती, सूचना वा आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल मराठी व इंग्रजी शासनाच्या विविध सूचित (Notified) केलेल्या कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेला होता.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

बैठकीच्या सुरवातीस डॉ. पदमश्री बैनाडे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी - रायगड तथा अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांची जनसुनावणीस काही अपरिहार्य कारणांमुळे उशिरा आल्याबददल दिलगीरी व्यक्त केली. श्री जे. एच. साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ रायगड तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना बैठकीचे कामकाज सुरु करण्याची सूचना केली.

श्री जे. एच. साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ रायगड तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी

समिती व सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सांगितले की लोणा इंडस्ट्रिज लिमिटेड, लाडिवली, पोस्ट-गुळसुंदे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड यांच्या कार्यरत सेंद्रिय रंगद्रव्य प्रकल्पात प्रस्तावित विस्तारीकरणासाठी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. त्यांनी सांगितले की ही जनसुनावणी ही तीन पध्दतीने होईल. प्रथम प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार संपूर्ण प्रकल्पाविषयी, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत संपूर्ण माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थितांना सांगतील. त्यानंतर उपस्थितांचे त्याबाबत काही आक्षेप, सूचना असल्यास त्या त्यांना उपस्थित करण्याची संधि देण्यात येईल. त्यास उत्तर प्रकल्प प्रवर्तक, प्रकल्प सल्लागार वा पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती देईल व नंतर बैठकीचा समारोप करण्यात येईल. त्यांनी प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित विस्तारीकरणासंबंधी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण करण्याची सूचना केली व उपस्थितांना सादरीकरण शांततेने ऐकण्याचे आवाहन केले.

प्रकल्प प्रवर्तकांच्या सल्लागार यांनी सादरीकरण सादर केले. त्यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी आवश्यक असलेले १० कि.मी. परिघाचे सर्वेषण, प्रकल्प विस्तारिकरणाची संपूर्ण माहिती, प्रकल्पाचा पर्यावरण

व्यवस्थापन योजना (Environment Management Plan) व आपत्कालिन व्यवस्थापन योजना (Disaster Management Plan) याविषयी संपूर्ण माहिती दिली.

प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की सदरहू कंपनीची उत्पादने ही कॅनडा, युनायटेड किंगडम, इटली, स्पेन, साऊथ कोरिया इत्यादि विविध देशात निर्यात होतात. विस्तारिकरणामुळे परकीय चलनात वाढ होईल.

सादरीकरणानंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या काही सूचना वा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**<u>खालील उपस्थितांनी जनसुनावणीच्या चर्चेत भाग घेतला व त्यास प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार यांनी दिलेली उत्तरे -</u>**

१) **<u>श्री हरिश्चंद्र धर्मा कालेकर, राहणार- लाडिवली, पोस्ट - गुळसुंदे, तालुका-पनवेल, जिल्हा - रायगडः-</u>**

आम्ही लेखी स्वरुपात आक्षेप नोंदविलेले आहेत. माझे गाव कंपनीपासून ३० मीटर्स अंतरावर आहे. कंपनी आपले वाया गेलेले पदार्थ/साहित्य (wastage) हे गावात फेकून देते. याबाबत कंपनीशी चर्चा केलेली आहे. मात्र काहीही उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे कंपनीतील

जल प्रदूषणामुळे गावातील भूगर्भातील पाणी हे खराब झालेले आहे. गावात नुकतीच एक बोअर घेतली. तेथे केमिकल मिश्रित पाणी येते. गावातील पाणी पिण्यास योग्य न राहण्यास कंपनीच जबाबदार आहे.

उपस्थित असलेल्या काही व्यक्तींनी श्री कालेकर यांना बोअर कुठे घेतली याबाबत विचारणा केली. त्यावेळी त्यांनी रेल्वे फाटकाजवळ घेतल्याचे सांगितले.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी याबाबत प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना उत्तर देण्यास सांगितले.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करताना सर्वेषण तीन महिन्याच्या कालावधीचे करण्यात आलेले आहे. प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघात विविध ठिकाणी भूगर्भातील पाण्याचे नमुने घेण्यात आलेले आहेत. त्यांचे विश्लेषण अहवाल उपलब्ध आहेत. त्यात कुठलाही घातक स्वरुपाचा घटक भूगर्भातील पाण्याच्या नमुन्यात आढळलेला नाही. त्यामुळे त्यांनी ज्याबाबत आक्षेप घेतलेला आहे, त्यास प्रकल्प जबाबदार नाही.

पर्यावरण सल्लागार यांनी पुढे सांगितले की गोळा केलेल्या भूगर्भातील पाण्याच्या नमुन्यांमध्ये क्लोराईड, फिकल कॉलिफॉर्म हे घटक आढळले. मात्र उपस्थित करण्यात आलेल्या आक्षेपांनुसार आजूबाजूच्या गावातील शौचालयातील पाणी, गटाराचे पाणी वा अस्वच्छता यामुळे भूर्गभातील विशिष्ट जागेतील पाण्याचा नमुना हा खराब असू शकतो. त्यास प्रकल्प जबाबदार नाही. तरी आक्षेप घेतलेल्या विशिष्ट स्थानावरिल भूगर्भातील पाण्याचा नमुना मान्यताप्राप्त संस्थेकडून / मप्रनि मंडळाकडून गोळा करण्यात यावा ही विनंती करण्यात येते.

२) **<u>श्री गजानन अनंत मालुसरे, आकुळवाडी, पोस्ट-गुळसुंदे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगडः-</u>**

मी प्रकल्प स्थानापासून १०० मीटर्स अंतरावर आकुळवाडीस राहतो. वारा किंवा पाणी हे पश्चिमेकडून पूर्वेकडे वहात असतात. मला असे वाटत नाही की पूर्वेकडून पश्चिमेकडे वारा किंवा पाणी वाहते. आता येथे श्री हरिश्चंद्र धर्मा कालेकर यांनी बोअरवेलचे पाणी खराब येते हा उपस्थित केलेला आक्षेप पूर्णपणे चुकीचा आहे. त्यावेळी उपस्थितांनी टाळ्या वाजवून पाठिंबा दर्शविला.

श्री मालुसरे यांनी पुढे असे सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांकडून दरवर्षी आरोग्यतपासणी घेतली जाते. त्याचा अहवाल हा महाराष्ट्र शासनाच्या औद्योगिक सुरक्षा व

आरोग्य संचालनालयास (DISH) वेळोवेळी सादर करण्यात येतो.

यावेळेस अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी मत मांडले की प्रकल्पास आपली सहमती आहे असे दिसून येते. मात्र बैठकीत आक्षेपार्थ मुद्द्यांचा प्रथम विचार करण्यात यावा.

३) <u>श्री दयानंद मोरेश्वर भगत, राहणार-खारपाडा, पोस्ट-दुश्मी, तालुका-पेण, जिल्हा-रायगडः-</u>

आम्ही ग्रामपंचायत दुश्मीज वळ येथील रहिवाशी आहोत. ग्रामपंचायतीचे सदस्य, सरपंच येथे उपस्थित आहेत. जवळजवळ सर्वच उपस्थितांनी टाळ्या वाजवून प्रकल्पास पाठिंबा दिलेला आहे. येथे प्रदूषणाबाबत चर्चा झालेली आहे. आम्ही सदरहू प्रकल्प हा खारपाड्याला नेण्याची विनंती करण्यासाठी आलेलो होतो. कारण एमआयडीसीतील व इतर कंपनीतील सांडपाणी हे खारपाड्याला सोडण्यात येते: त्यामुळे खरे तर खारपाड्याच्या लोकांना त्याचा त्रास होतो. त्यावर उपाययोजना कराव्यात. प्रगतीसाठी कंपन्या आवश्यक आहेत. आम्ही कंपन्यांना खारपाडयाला येण्याची विनंती केलेली आहे. कंपनीचा प्रकल्प जेथे होतो, त्याबद्दल आम्हांला आनंद आहे. कंपनीने सीएसआर नुसार थोडीफार मदत खारपाडयाला केलेली आहे. कंपनी व कामगार जगलेच

पाहिजे. शासनाने प्रदूषणाचा प्रश्न वेळोवेळी मार्गी लावावा. आमचा प्रकल्पास पूर्ण पाठिंबा आहे.

४) **<u>श्री रामचंद्र धोंडू पाटील, मुक्काम - गुळसुंदे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड,</u>**

सद्या जागतिक मंदी चालू आहे. बरेच कारखाने बंद पडत आहेत. मात्र गेले ५० वर्षे मेहनतीने कामगारांनी कंपनी चालविली व वाढविली आहे असे लोणा कंपनीच्या मालकांचे मत आहे. या प्रकल्पामुळे ५०० कुटुंबे जगत आहेत. कंपनीची उत्पादन वाढविण्याची क्षमता आहे. कंपनीचा उद्देश चांगला आहे. १० कि.मी. परिसरातील स्थानिक लोक या कंपनीत कामास आहेत. आमची प्रकल्पास सहमती आहे.

५) **<u>श्री प्रमोद रामचंद्र विध्वंस, राहणार-गुळसुंदे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगडः-</u>**

मी स्थानिक रहिवाशी असून प्रकल्पात ३९ वर्षे काम केलेले आहे. १९६७ सालापासून अतिशय दिमाखाने कारखान्याने प्रगती केलेली आहे. कंपनीने परिसरात सामाजिक उपक्रम राबवविले आहेत. तरी मी सर्वांना विनंती करतो की सर्वांनी एकमताने कंपनीस पाठिंबाच्या ठराव मंजूर करावा. श्री उजणे यांनी उपस्थितांना श्री विध्वंस यांनी मांडलेल्या ठरावास पाठिंबा असणा-यांनी हात वर करून पाठिंबा देण्याचे

आवाहन केले. सर्व उपस्थितांनी हात वर करुन पाठिंबा दर्शविला. श्री विध्वंस यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस त्यांच्या अधिपत्याखाली सर्वानुमते ठराव मंजूर झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे बैठकीचा समारोप करावा असे मनोगत व्यक्त केले.

६) त्यावेळी बोअरच्या मुद्द्यावरुन आक्षेप नोंदविताना **श्री भालचंद्र महाद् वाघे, राहणार- लाडिवली, पोस्ट - गुळसुंदे, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड** यांनी सांगितले की रेल्वेफाटकाजवळ जे बोअर आहे, त्या पाण्याला केमिकलचा वास येतो. त्याची चाचणी होणे गरजेचे आहे. यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी या मुद्द्यावर चर्चा झालेली असून परत त्यावर चर्चा करु नये असे मत मांडले.

७) **श्री दत्तात्रय गणा पाटील, माजी सरपंच, आपटा गाव, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड-**

त्यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस विनंती केली की कंपनीस जगवा, कंपनीस वाचवा. सर्व उपस्थितांनी टाळ्या वाजून सहमती दर्शविली. त्यांनी कंपनील विनंती केली की झाडे भरपुर प्रमाणात लावण्यात यावी.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे जनसुनावणीचा समारोप करताना सांगितले की प्रकल्पाच्या विस्तारिकरणासाठी सदरहू जनसुनावणी होती. तसेच त्या २-३ मुद्दे उपस्थित करु इच्छितात. -

१) या जनसुनावणीदरम्यान महिलावर्गाची उपस्थिती लक्षणिय आहे. तरी विस्तारिकरण प्रकल्पात महिला वर्गाला रोजगाराची संधि देऊन प्रकल्पात सहभागी करुन घ्यावे. सर्व उपस्थितांनी टाळ्या वाजवून त्यास पाठिंबा दर्शविला,

२) बैठकीत खारपाड्यास कंपनी हलवावी किंवा कंपनीने दुसरी विस्तारित कंपनी खारपाड्यास सुरु करावी अशी मागणी करण्यात आली. सदरहू बाब ही कंपनीपेक्षा स्थानिकांवरच जास्त अवलंबून आहे. कारण त्यांनी कष्ट करुन कंपनी वाढवली, तर कंपनीस काम करुन नफा जास्त होत असेल, तर कंपनी दुसरीही कंपनी किंवा शाखा

काढू शकते, या मुद्द्यासही उपस्थितांनी टाळ्या वाजवून स्वागत केले.

३) कंपनीची मुळ गुंतवणूक ही ९४ कोटी ५४ लाख एवढी आहे. त्याअनुषंगाने सीएसआर हा ७% प्रमाणे सहा कोटी खर्च होणे अपेक्षित आहे. तेवढा झालेला नाही. सादरीकरणात सामाजिक उपक्रमांचे फोटो दाखविण्यात आले. मात्र ते कमी आहे. तरी प्रकल्पग्रस्त गावातील लोकांकडून सामाजिक उपक्रमांची मागणी घेण्यात यावी. तहसील कार्यालय व मप्रनि मंडळ आपल्या संपर्कात राहिल. ज्या गावात ज्या ज्या सामाजिक उपक्रमांची गरज आहे उदा.- शौचालय सुविधा, अंगणवाडी, शाळेचे साहित्य इत्यादीसाठी सदरहू ६ कोटी रुपये या आर्थिक वर्षात सामाजिक उपक्रमांसाठी खर्च करणे अपेक्षित आहे अशी सूचना प्रकल्प प्रवर्तकांना करण्यात येते. हा मुद्दा इतिवृतान्तात समावेश करण्यात यावा अशी सूचना त्यांनी केली.

यानंतर अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सदरची जनसुनावणी यशस्वीरित्या संपन्न् झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

सदरच्या जनसुनावणीदरम्यान एकूण ३ निवेदने प्राप्त झाली ती या इतिवृत्तास जोडली आहेत. (परिशिष्ठ “क”)

9/3/2020

**(सचिन आडकर)**
समन्वयक,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
रायगड - १,
मप्रनि मंडळ, नवी मुंबई

**(ज. शं. साळुंखे)** ,
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी-रायगड
मप्रनि मंडळ ,नवी मुंबई

**(डॉ. पदमश्री बैनाडे),**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, रायगड,
जिल्हा-रायगड